**जा.क्र.मप्राशिप/सशि/प्रशा/काअ/एसी/२०२०-२१/६८४** **दि.०२/०३/२०२१**

**प्रति,**

............................
............................

**विषय : महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद कार्यालयांतर्गत प्राथमिक व माध्यमिक विभागातील वातानुकुलित यंत्रांच्या देखभाल व दुरूस्तीचा वार्षिक सेवाकरार व दरकरार करणेबाबत.**

महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद कार्यालयांतर्गत प्राथमिक व माध्यमिक एकूण ५१ वातानुकुलित यंत्रे कार्यरत आहेत. सदर वातानुकुलित यंत्रांच्या देखभाल व दुरूस्तीचा तपशील पुढीलप्रमाणे देण्यात येत आहे.

| Sr. No. | Company | Ton | Quantity | Total Ton |
|---|---|---|---|---|
| 1. | Daikin | 2.0 | 14 | 28.0 |
| 2. | Daikin | 1.5 | 02 | 3.0 |
| 3. | Carrier | 2.0 | 18 | 36.0 |
| 4. | Panasonic | 1.5 | 03 | 4.5 |
| 5. | Lloyed | 2.0 | 02 | 4.0 |
| 6. | Power cool | 1.5 | 03 | 4.5 |
| 7. | Voltas | 2.0 | 01 | 2.0 |
| 8. | Voltas | 1.5 | 04 | 6.0 |
| 9. | L. G. | 2.0 | 04 | 8.0 |
| Total | | 16.0 | 51 | 96.0 |

वरील तक्तात दर्शविल्याप्रमाणे वातानुकुलित यंत्रांचा वॉरंटी कालावधी संपुष्टात आलेला आहे. मात्र, सदर वातानुकुलित यंत्रे सुस्थितीत कार्यरत आहेत. या कार्यालयातील कार्यरत असलेल्या सर्व वातानुकुलित यंत्रांच्या देखभाल व दुरूस्तीबाबतचा वार्षिक सेवाकरार करण्यात येणार आहे.

सदर वातानुकुलित यंत्रांच्या देखभाल व दुरूस्तीबाबतचा वार्षिक सेवाकरारातील अटी व शर्ती पुढीलप्रमाणे आहेत.

१. सदर वातानुकुलित यंत्रे वॉरंटीत असो किंवा नसो, तसेच भविष्यात नवीन वातानुकुलित यंत्रे या कार्यालयामार्फत खरेदी करण्यात आल्यास त्या वातानुकुलित यंत्रांच्या देखभाल व दुरूस्तीचे काम पुरवठादारास करावे लागणार आहे व त्याकरिता कोणताही अतिरिक्त खर्च दिला जाणार नाही.

Scanned by CamScanner

२. वातानुकुलित यंत्रांच्या देखभाल व दुरूस्तीचे काम महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद कार्यालय, मुंबई (प्राथमिक व माध्यमिक विभाग) व समग्र शिक्षा कार्यालय, पुणे या कार्यालयातच उपस्थित राहून करावे लागणार आहे. परंतु, अपवादात्मक परिस्थितीत वातानुकुलित यंत्रांच्या देखभाल व दुरूस्तीचे काम कार्यालयाच्या बाहेर घेऊन करावे लागल्यास, सह संचालक (प्रशासन) यांच्या पूर्वपरवानगीने वातानुकुलित यंत्रे पुरवठादार बाहेर घेऊन जाऊ शकतात.

३. सदर सेवाकरारांतर्गत वातानुकुलित यंत्रांच्या देखभाल व दुरूस्तीचे कामासाठी नियमितपणे सर्व्हिसिंग करणे, गॅस रिफिलिंग करणे, आवश्यकतेनुसार नवीन स्पेअर पार्ट्स बसविणे व सर्व वातानुकुलित यंत्रे कार्यरत ठेवणे, याबाबतची जबाबदारी पुरवठादाराची राहील.

४. या कार्यालयातील वातानुकुलित यंत्रांच्या देखभाल व दुरूस्तीचा वार्षिक सेवाकरार एक वर्षाकरिता करण्यात येणार आहे. तसेच सेवाकरार कालावधीमध्ये पुरवठादाराने प्रदान केलेली सेवा समाधानकारक असल्यास पुढील एक वर्षासाठी त्याच दराने पुरवठा देण्याबाबत प्राधिकृत अधिकारी यांच्या मान्यतेने विचार करता येऊ शकेल.

५. पुरवठादाराने त्यांचा दर Excluding GST असा सादर करण्यात यावा.

६. पुरवठादार त्यांचा दर सादर करण्यापूर्वी या कार्यालयातील वातानुकुलित यंत्रांची पाहणी करू शकतात. त्यानुसार ते त्याचा दर सादर करु शकतील.

७. पुरवठादाराने त्यांच्या दरपत्रकासोबत पुढीलप्रमाणे नमूद केलेली कागदपत्रे स्वतंत्र लिफाफ्यामध्ये जोडणे आवश्यक आहे. या लिफाफ्यावर "वातानुकूलित यंत्रांची देखभाल दुरुस्ती करिता तांत्रिक निविदा" असे लिहिणे आवश्यक आहे.

  a. दुकाने व आस्थापना नोंदणीचे प्रमाणत्राची पत्र.
  b. जीएसटी रजिस्ट्रेशनची प्रत (वार्षिक उलाढाल रू.४०.०० लाखापेक्षा जास्त असल्यास).
  c. वार्षिक उलाढाल रू.४०.०० लाखापेक्षा कमी असल्यास सेल्फ डिक्लरेशनचे पत्र.
  d. मागील ३ वर्षांच्या वार्षिक उलाढालीबाबतचे सनदी लेखापालांनी प्रमाणित केलेले प्रमाणपत्र (सन २०१७-२०१८, २०१८-२०१९, २०१९-२०२०).सन २०१९-२० चे सनदी लेखापालाने प्रमाणित केलेले प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास Provisional Balance sheet सादर करावे.
  e. पॅन कार्डची प्रत.

८. पुरवठादारास दरपत्रकासोबत इसारा रकमेपोटी (EMD) रू.९,२३२/- इतक्या रकमेचा - समग्र शिक्षा, मुंबई या नावाने कोणताही राष्ट्रीयकृत किंवा शेड्यूल कमर्शिअल बँकेवर काढलेला (Payable at Mumbai) चा धनाकर्ष सादर करणे आवश्यक राहील. हा धनाकर्षसुध्दा तांत्रिक निविदेच्या लिफाफ्यातील दस्तऐवजांसोबत जोडण्यात यावा.

Scanned by CamScanner

९. निवड झालेल्या पुरवठादास सेवाकराराच्या एकूण रकमेच्या ५% प्रमाणे अनामत रक्कम (Security Deposit) सादर करणे बंधनकारक राहील.

१०. पात्र ठरलेल्या पुरवठादाराची इसारा रक्कम (EMD) त्यांच्याकडून अनामत सुरक्षा रक्कम (Security Deposit) सादर केल्यानंतर एक महिन्याच्या आत त्यांना परत करण्यात येईल. तसेच अपात्र असलेल्या (Unsuccessful) पुरवठादारांची इसारा रक्कम (EMD) निवड प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर एक आठवड्याच्या आत त्यांना परत करण्यात येईल.

११. सदर दरपत्रक या कार्यालयाचे संकेतस्थळ https://samagrashiksha.maharashtra.gov.in वर प्रसिद्ध करण्यात आले आहे. इच्छूक पुरवठादार सदर संकेस्थळाला भेट देऊन आवश्यक ती माहिती प्राप्त करून घेऊन विहित मुदतीच्या आत त्यांचे दरपत्रक या कार्यालयास सादर करू शकतील.

१२. वातानुकुलित यंत्रांच्या देखभाल व दुरूस्तीसाठी प्राप्त झालेले कोणतेही दरपत्रक किंवा सर्व दरपत्रके रद्द करण्याचा अधिकार राज्य प्रकल्प संचालक यांना आहेत.

१३. तसेच निवड करण्यात येणाऱ्या पुरवठादाराची सेवा समाधानकारक नसल्यास त्याचा सेवाकरार कोणतेही कारण न देता केव्हाही रद्द करण्याचा अधिकार मा.राज्य प्रकल्प संचालक, मप्राशिप, मुंबई यांना राहील.

आपणास कळविण्यात येते की, वरीलप्रमाणे वातानुकुलित यंत्रांच्या देखभाल व दुरूस्तीचा वार्षिक सेवाकरार करण्याबाबत आपले Comprehensive & Non comprehensive असे दोन्ही प्रकारचे दर, स्वतंत्र सिलबंद लिफाफ्यावर "वातानुकूलित यंत्रांची देखभाल दुरुस्ती करिता वित्तीय निविदा" असे लिहून दि.१०/०३/२०२१ रोजी १५.०० वाजेपर्यंत या कार्यालयास सादर करण्यात यावे.

SD

**(राजेंद्र पवार)**
**राज्य प्रकल्प समन्वयक तथा,**
**सहसंचालक (प्रशासन),**
**म.प्रा.शि.प., मुंबई.**

Scanned by CamScanner

## Quotation for Compressive AMC

| Sr. No. | Company | Ton | Quantity | Rate Per Unit (Rs.) | Total Rate (Rs.) |
|---|---|---|---|---|---|
| 1. | Daikin | 2.0 | 14 | | |
| 2. | Daikin | 1.5 | 02 | | |
| 3. | Carrier | 2.0 | 18 | | |
| 4. | Panasonic | 1.5 | 03 | | |
| 5. | Lloyed | 2.0 | 02 | | |
| 6. | Power cool | 1.5 | 03 | | |
| 7. | Voltas | 2.0 | 01 | | |
| 8. | Voltas | 1.5 | 04 | | |
| 9. | L. G. | 2.0 | 04 | | |
| Total | | 16.0 | 51 | | |

## Quotation for Non Compressive AMC

| Sr. No. | Company | Ton | Quantity | Rate Per Unit (Rs.) | Total Rate (Rs.) |
|---|---|---|---|---|---|
| 1. | Daikin | 2.0 | 14 | | |
| 2. | Daikin | 1.5 | 02 | | |
| 3. | Carrier | 2.0 | 18 | | |
| 4. | Panasonic | 1.5 | 03 | | |
| 5. | Lloyed | 2.0 | 02 | | |
| 6. | Power cool | 1.5 | 03 | | |
| 7. | Voltas | 2.0 | 01 | | |
| 8. | Voltas | 1.5 | 04 | | |
| 9. | L. G. | 2.0 | 04 | | |
| Total | | 16.0 | 51 | | |

**Signature of the**
**Authorized Signatory**
**With rubber stamp**

Scanned by CamScanner